स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 17–04–2017 रोजी दुपारी 12–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 6. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 8. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 9. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 10. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 11. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 12. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 2. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 3. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 4. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 11:– नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील नारी येथे, कामठी रोड ते {लोककर्म झोन 09} आरमोर्स टॉवर रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर. बी. केवलरामाणी यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 3,99,99,985/– पेक्षा 11.05 टक्के कमी दराची रू. 3,55,79,987/–(रूपये तीन कोटी पंच्चावन लक्ष ऐकोणऐंशी हजार नऊशे सत्याऐंशी) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, तसेच हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 12ः— शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात {लोककर्म झोन 04} मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 22 ब, गिट्टीखदान भागामध्ये सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी में. पटेल ॲण्ड शर्मा इंनप्राटेक हयांची मुळ प्राकलनीय प्राकलनीय दरापेक्षा 15.55 टक्के कमी दराची निविदा रूपये 51,40,945/– (रूपये ऐक्कावन लक्ष चाळीस हजार नऊशे पंचेचाळीस रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 13ः— शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात {लोककर्म झोन 04} मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 10 ब, मोहन नगर येथे गणेश मंदीर ते जुने पोस्ट ऑफीस रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी में. आर. एम. दयारमानी हयांची प्राकलनीय दराची निविदा रूपये 29,98,687/– (रूपये ऐकोणतीस लक्ष अठयानऊ हजार सहाशे सत्यांशी रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 14ः— शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात {लोककर्म झोन 04} मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 23 देशराज नगर ते गंगानगर येथे सी. सी. रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी में. एस. के. चरडे हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 13.95 टक्के कमी दराची निविदा रूपये 25,84,650/– (रूपये पंचविस लक्ष चौ–यांशी हजार सहाशे पन्नास रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली .

ठराव क्रमांक 15ः— नागपूर महानगरपालिकेच्या जिल्हा व सत्र न्यायालयातील {अभियोजन विभाग} / कामगार व औद्योगीक न्यायालयातील / ग्राहकपंचायत व इतर न्यायायलयातील वकिलांच्या पॅनलवर असलेल्या वकिलांची सेवा वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या मासीक मानधनावर घेण्यात येत आहे. उक्त न्यायालयांकरीता एकूण 11 वकिलांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्या मानधनाकरीता रु. 1,80,500/— दरमाहप्रमाणे एकूण रु. 21,66,000/— वर्षाचा खर्च होत आहे. तसेच दरवर्षी वकिलांकडून मानधनामधे वाढ करण्याकरीता मागणी होते करीता प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांनी सुचविल्या प्रमाणे विधी विभागाने प्रायोगीक तत्वावर उच्च न्यायालयाकरीता मासीक मानधनाऐवजी प्रकरणा (केस) प्रमाणे वकिलांची फिस निश्चिती करण्याकरीता विस्तृत अध्यन करुन अहवाल तत्कालीन स्थायी समिती पुढे ठेवलेला होता व मा. स्थायी समितीने ठराव क्र. 153 दिनांक 27.08.2015 नुसार मान्यता प्रदान केली होती व उक्त ठराव दिनांक 01.09.2015 पासून कार्यान्वित करण्यात आलेला असून त्याचे परिणाम महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टिने अत्यंत चांगले व समाधानकारक आहेत करीता त्याच धर्तीवर जिल्हा व सत्र न्यायालयातील/कामगार व औद्योगीक न्यायालयातील/ग्राहकपंचायत व इतर न्यायायलयातील वकिलांच्या पॅनलवर असलेल्या वकिलांची सेवा मासीक मानधनाऐवजी प्रकरणानिहाय करण्याकरीता विस्तृत अहवाल तयार केलेला असून तो नस्तिच्या डाव्या बाजूला (पान क्र. 29 ते 33) माहितीस्तव टाचण केलेला आहे. उपरोक्त न्यायालयांकरीता मासीक मानधनाऐवजी प्रकरण प्रमाणे फिस निश्चिती केल्यास उपरोक्त न्यायालयातील कामे जास्त सुव्यवस्थित पद्धतीने चालतील व म.न.पा. चा दर महिन्याचा आर्थिक बोझा अगदी कमी होऊन जाईल अशी प्रशासनाची धारणा आहे, करीता मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे विभागीय प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरी करीता सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन विस्तृत माहिती व जे शुल्क प्रस्तावित केले आहे ते स्थायी समितीच्या विषय पत्रिकेत समाविष्ट करुन विषय परत सादर करावा यासह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 16ः— {लोककर्म झोन 04} शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 24 हजारीपहाड येथील गायत्री नगर कॉलोनी येथे नाल्याची भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी में. पटेल ॲण्ड शर्मा इंनप्राटेक हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 15.55 टक्के कमी दराची निविदा रूपये 42,06,771/— (रूपये बेचाळीस लक्ष सहा हजार सातशे ऐक्यात्तर रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 17ः— {कार्यकारी अभि. 1} प्रभाग क्र. 32 क्वेटा कॉलोनी येथे पाटीदार भवन ते देवडीया दवाखान्या पर्यन्त सिमेंट कॉक्रीटचे रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. आर. बी. केवलरामानी यांची प्राकलनिय दरापेक्षा १४.५०% टक्के ने कमीवर असलेली रू. ४४,२०,९०४/— (चौरेचाळीस लक्ष, वीस हजार, नऊशे चार फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 18ः— {लोककर्म झोन 03} हद्दवाढ झालेल्या क्षेत्रात पायाभूत सोयी सुविधा निर्मिती करिता नागपूर महानगरपालिकाद्वारा शासनास सादर करण्यात आलेला हुडकेश्वर—नरसाळा या भागातील स्मशानघाट विकास कामास्तव रू.३.२७ कोटी , हुडकेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम करण्याकरिता रू.०.६६ कोटी आणि हुडकेश्वर—नरसाळा मनोरंजन मैदान विकास करण्यासाठी रू.३.६७ असे एकूण रक्कम ७.६० कोटीचा प्रस्तावास शासनाने महानगरपालिकेची २० टक्के हिस्साची रक्कम रू. १.५१ कोटी भरण्यास सहमती असल्याचा ठराव मंजुर करणे या अटीच्या अधीन राहुन मंजुरी दिलेली आहे. करीता शासनाचे अटीनुसार म.न.पा चा हिस्सा २० टक्के प्रमाणे उपरोक्त नमूद विकास कामास्तव रू.१.५१ कोटी रक्कमेचा सहभाग देण्याचा व खर्च पद क्र. A42001374602 अंतर्गत सन २०१७—२०१८ चे तरतुदी मधुन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

स्थायी समिती चे मान्यतेनंतर प्रस्ताव महासभे पुढे सादर करण्यात येईल.

ठराव क्रमांक 19ः— {लोककर्म झोन क्र. 4} शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 8 ब, बोरगांव चौक ते गोरेवाडा चुंगी नाक्या पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी निम्नतम निविदाकार में. आर. एम. दयारमानी हयांची प्राकलनीय दराची निविदा रूपये 49,94,190/—(रूपये एकोन पन्नास लक्ष चौ—या नऊ हजार ऐकशे नव्वद रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रस्ताव महासभे पुढे सादर करण्यात येईल.

ठराव क्रमांक 20 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |